**<u>ठळक बातम्या</u>**

- महिला यशस्वी झाल्या तरच समाज आणि देश यशस्वी होईल, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन

- बिहारमध्ये मंत्रीमंडळ विस्तारात भाजपाच्या ७ नव्या मंत्र्यांचा शपथविधी

- प्रयागराज इथल्या महाकुंभ मेळ्याची आज सांगता

- सुदानमधे लष्करी विमान कोसळून झालेल्या अपघातात ४६ जणांचा मृत्यू

**आणि**

- आयसीसी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत अफगाणिस्तानचं इंग्लंडपुढं विजयासाठी ३२६ धावांचं आव्हान

**<><><><><><>**

महिला आपल्या जीवनात यशस्वी होतील तेव्हाच समाज आणि देश यशस्वी होईल, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे.  मध्य प्रदेशातल्या छत्तरपूर जिल्ह्यात २५१ तरुणींच्या विवाह सोहळ्याप्रसंगी त्या आज बोलत होत्या. विकसित भारत हा सरकारचा संकल्प असून त्यासाठी समाजातल्या सर्व घटकांचा विकास होणं आवश्यक आहे असं राष्ट्रपती म्हणाल्या. यावेळी राष्ट्रपतींनी नवविवाहितांना साडी आणि कपडे भेट दिली. मध्य प्रदेशाचे राज्यपाल मंगु भाई पटेल आणि मुख्यमंत्री मोहन यादव यावेळी उपस्थित होते.

**<><><><><><>**

केंद्रीय शिक्षण मंडळाशी संलग्न शाळांना आता एकाच नावाने आणि एकाच संलग्नता नोंदणी क्रमांकावर वेगळ्या शाखा सुरु करता येतील. याकरता नियमांत आवश्यक

बदल केले असल्याची माहिती  मंडळाचे सचिव हिमांशु गुप्ता यांनी आज दिली. दोन्ही शाळांची साधनसामुग्री आणि पायाभूत सुविधा पूर्णपणे वेगळ्या ठेवाव्या लागतील. शाखांना पूर्वप्राथमिक ते ५वी पर्यंतचे वर्ग घेता येतील. शाखेतून ५वी उत्तीर्ण करुन मुख्य शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा नवीन प्रवेश मानला जाणार नाही असं त्यांनी सांगितलं. मुख्य शाळेला ६ वी ते १२ वी पर्यंत वर्ग चालवता येतील. मुख्य शाळेचं एकच संकेतस्थळ असेल आणि त्यावर शाखांसाठी जागा ठेवलेली असेल,  तसंच शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी वेगवेगळे असले तरी त्यांचं वेतन मुख्य शाळेच्या खात्यातूनच दिलं जाईल.

**<><><><><><>**

विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमधे केंद्रसरकारनं कपात केल्याचा काँग्रेसचा आरोप केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी फेटाळला आहे. अल्पसंख्याक, मागासवर्गीय इत्यादी विविध शिष्यवृत्या केंद्रसरकारनं कमी केल्याचा आरोप कांग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केला होता. मात्र प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारनं अल्पसंख्याकांचं कधी नव्हे इतकं सक्षमीकरण केलं असून शिष्यवृत्ती, संधी आणि पारदर्शकतेत वाढ झाली असल्याचं रिजिजू यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

**<><><><><><>**

बिहारमध्ये मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाचा आज विस्तार झाला. या विस्ताराअंतर्गत राज्यपाल अरिफ मोहम्मद खान यांनी संध्याकाळी पटणा इथं राजभवनात सात नव्या मंत्र्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. हे सर्व नवे मंत्री भाजपाचे आहेत. नव्या मंत्र्यांमध्ये जिबेश कुमार आणि राजू कुमार सिंह या जुन्या चेहऱ्यांचा समावेश आहे. त्यांच्याशिवाय संजय सरावगी, कृष्ण कुमार मंटू, डॉ. सुनील कुमार, मोटीलाल प्रसाद आणि विजय कुमार मंडल यांना पहिल्यांदाच मंत्रीपदाची जबाबदारी दिली गेली आहे. या विस्तारानंतर

मुख्यमंत्र्यांसह नितीश कुमार यांच्या मंत्रिमंडळातील एकूण सदस्यसंख्या ३६ झाली आहे.

<><><><><><>

जगातला सर्वात मोठा  आध्यात्मिक आणि सांस्कृतिक मेळावा मानला जाणाऱ्या महाकुंभाचा समारोप आज महाशिवरात्रीच्या दिवशी होत आहे. १४४ वर्षातून एकदाच येणाऱ्या या पर्वानिमित्त गंगा यमुना आणि सरस्वती या तीन पवित्र नद्यांच्या संगमावर प्रयागराज इथं करोडो भाविकांनी स्नानाचा लाभ घेतला. पौष पौर्णिमेला सुरु झालेला हा महाकुंभमेळा जगाच्या कानाकोपऱ्यातल्या लोकांसाठी आकर्षण ठरला आहे.  सुमारे साडे पासष्ट कोटी भाविकांनी महाकुंभात स्नान केल्याचा प्रशासनाचा अंदाज आहे.

<><><><><><>

नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी वेगळे कुंभमेळा प्राधिकरण निर्माण करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईत आढावा बैठकीत दिल्या. तसेच हा सिंहस्थ कुंभ 'डिजिटल टेक्नॉलॉजी कुंभ' म्हणून ओळखला जावा, यासाठीचे नियोजन करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

<><><><><><>

चंद्रपूरमध्ये २ स्वतंत्र घटनांमध्ये आज ६ जणांचा बुडून मृत्यू झाला. राजुरा तालुक्यात वर्धा नदीवर आंघोळीसाठी गेलेले ३ युवक बुडाले. सावली तालुक्यात ३ मुली वैनगंगा नदीच्या पात्रात बुडाल्या. हे सर्वजण आंघोळीसाठी नदीत उतरले होते.

<><><><><><>

उत्तराखंडमधल्या केदारनाथ मंदिराचे दरवाजे येत्या २ मे रोजी सकाळी ७ वाजता उघडतील, असं आज देवस्थान समितीने जाहीर केलं.  त्यापाठोपाठ बद्रीनाथ धामचे दरवाजे ४ मे रोजी उघडतील. गंगोत्री आणि यमुनोत्री इथल्या

मंदिरांचे दरवाजे येत्या ३० एप्रिल रोजी अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर उघडतील. चारधाम मधे समाविष्ट या चारही मंदिरांचे दरवाजे हिवाळ्यात बंद असतात.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमधल्या शालेय शिक्षक भरती घोटाळा प्रकरणी सीबीआयनं तिसरं पुरवणी आरोपपत्र दाखल केलं. सुजय वड्रो याचं नाव त्यात आहे. तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांनी त्याच्याकडे १५ कोटी रुपयांची मागणी केल्याचा सीबीआयचा दावा आहे.

**<><><><><>**

सीबीआयनं गेन बिटकॉईन घोटाळ्या प्रकरणी २४ कोटी रुपयांच्या क्रिप्टोकरन्सी जप्त केल्या आहेत. या घोटाळ्याचा तपास करण्यासाठी ६० ठिकाणी छापे टाकल्याचं सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी  सांगितलं.  यात ३४ लॅपटॉप, हार्ड डिस्क आणि १२ मोबाईल जप्त केले आहेत. जप्त केलेली कादपत्रं आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणं तपासली जात आहेत असं सीबीआयनं सांगितलं.

**<><><><><>**

पंजाबमध्ये पठाणकोट इथं आज सीमा सुरक्षा दलानं घुसखोरीचा प्रयत्न उधळून लावत एका पाकिस्तानी घुसखोराला ठार केले. सुरक्षा दलाच्या पथकाला आज पहाटे ताशपतन सीमा चौकीजवळ एकजण घुसखोरीचा प्रयत्न करत असल्याचं आढळलं, त्याला थांबण्याचा इशारा देऊनही तो पुढे सरकत राहिल्यानं, सुरक्षा दलाच्या जवानांनी केलेल्या कारवाईत  तो ठार झाला. या घुसखोराची ओळख पटवण्याचं आणि त्याच्या हेतूचा शोध घेण्याचं काम सुरू आहे, तसंच याबाबत पाकिस्तान रेंजर्सकडे तीव्र निषेध नोंदवला जाणार असल्याचं सीमा सुरक्षा दलानं म्हटलं आहे.

जम्मू जिल्ह्यात अखनूर सेक्टरमधल्या केरी बट्टल परिसरातही आज भारताच्या लष्कराला काही संशयास्पद हालचाल दिसल्यानंतर चकमक झाली. त्यानंतर सुरक्षा दलाच्या वतीनं व्यापक शोधमोहीम हाती घेतली आहे.

दरम्यान जम्मू - काश्मीरमध्ये राजौरी जिल्ह्यात, सुंदरबनी सेक्टरमधल्या फाल गावात, नियंत्रण रेषेजवळ लष्करी वाहनावर काही संशयित दहशतवाद्यांनी गोळीबार केला. यात कोणतीही जीवितहानी झालेल्याचं वृत्त नाही. हे दहशतवादी जंगलात लपल्याचा संशय असून, सुरक्षा दलानं शोधमोहीम सुरू केली आहे.

**<><><><><><>**

सुदानमधे ओमदुर्मन इथं लष्करी विमान कोसळून झालेल्या, अपघातातल्या मृतांची संख्या ४६ वर पोचली आहे. काल वाडीसैदना विमानतळावरुन उड्डाण करत असताना हे विमान कोसळलं. या दुर्घटनेत ठार झालेल्या आणि जखमी झालेल्यांमधे लष्करी जवान आणि सामान्य नागरिकांचाही समावेश आहे.

**<><><><><><>**

आयसीसी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज पाकिस्तानात लाहोर इथं सुरू असलेल्या सामन्यात अफगाणिस्ताननं इंग्लंडपुढं विजयासाठी ३२६ धावांचं आव्हान ठेवलं आहे.

अफगाणिस्तानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला, आणि निर्धारित ५० षटकात ७ गडी गमावून ३२५ धावा केल्या. शतकवीर इब्राहिम जदरानच्या १७७ धावांमुळे त्यांना ही धावसंख्या उभारता आली. महंमद नबीनं २४ चेंडूत ४० धावांचं योगदान दिलं.

इंग्लंडतर्फे जोफ्रा अर्चरनं ३ बळी घेतले.

**<><><><><><>**

महिलांच्या प्रिमिअर क्रिकेट स्पर्धेत मुंबई इंडियन्स आणि युपी वॉरियर्स यांच्यात सामना होत आहे. बेंगळुरूमध्ये सुरू असलेल्या या सामन्यात मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा युपी वॉरियर्सच्या ८ षटकात १ बाद ६८ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत आज नागपुरात सुरु झालेल्या अंतिम सामन्यात विदर्भानं पहिल्या डावात दिवसअखेर ४ बाद २५४ धावा केल्या. केरळनं नाणेफेक जिंकून विदर्भाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं, आणि अवघ्या २४ धावात विदर्भाचे आघाडीचे तीन फलंदाज तंबूत धाडले. मात्र त्यानंतर शतकवीर दानिश मालेवार आणि करूण नायर यांनी विदर्भाचा डाव सावरला. त्यांनी चौथ्या गड्यासाठी २१५ धावांची भागीदारी केली. करूण नायर ८६ धावा करुन बाद झाला. आजचा खेळ थांबला तेव्हा दानिश मालेवार १३८ धावांवर, तर यश ठाकूर ५ धावांवर खेळत होता.

केरळतर्फे एमडी निधीशनं दोन गडी बाद केले.

<><><><><>

केंद्र सरकारने राष्ट्रीय क्रीडा महासंघांना आर्थिक सहाय्य देण्याच्या निकषांचे पुनरावलोकन करण्यासाठी सहा-सदस्यीय समितीची स्थापना केली आहे. केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाने ही माहिती दिली आहे. क्रीडा विभागाचे सहसचिव कुणाल हे या समितीचे अध्यक्ष असणार आहेत. ही समिती १५ दिवसांत आपला अहवाल सादर करणार आहे.

पॅरिस ऑलिम्पिकनंतर नवीन ऑलिम्पिकचे पर्व सुरू झाले असल्यानं, बदलत्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर निकषांचं पुनरावलोकन गरजेचं असल्याचं

मंत्रालयानं म्हटलं आहे. याआधी २०२२ मध्ये राष्ट्रीय क्रीडा महासंघांना आर्थिक सहाय्य देण्याविषयीच्या निकषांमध्ये सुधारणा केली गेली होती.

<><><><><><>

इस्त्रायल आणि हमास यांच्यात गाझा शस्त्रसंधीच्या पहिल्या टप्प्यात निर्माण झालेला अडथळा दूर करण्यावर सहमती झाली आहे. इजिप्तच्या सरकारी प्रवक्त्यांनी यासंदर्भातलं निवेदन जारी केलं आहे. यानुसार इस्त्रायल त्यांच्या चार नागरिकांच्या मृतदेहांच्या बदल्यात, ६२० पॅलेस्टिनी नागरिकांना मुक्त करणार आहे.

या पॅलेस्टिनी नागरिकांची गेल्या शनिवारी मुक्तता होणं अपेक्षित होतं, मात्र पॅलेस्टीननं त्यांच्या ताब्यातल्या इस्त्रायली नागरिकांची सुटका करताना त्यांना क्रूर वागणूक दिल्याचा दावा इस्त्रायलनं केला होता, आणि ही सुटका रोखली होती. हमासनं हा शस्त्रसंधी कराराचा भंग असल्याचं म्हटलं आहे.

इस्त्रायल आणि हमास या दोघांनी परस्परांतल्या शस्त्रसंधीला मुदतवाढ दिली नाही तर या ४२ दिवसांच्या शस्त्रसंधीची मुदत या आठवड्याच्या अखेरीला संपणार आहे.

//<><><><><><>//